# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## छपाई व वितरण विभाग

## कोटेशन नोटीस

**कामाचे नाव :- मतदार जागृत्ती अभियानासाठी जनजागृत्ती स्टिकर्स छपाई करणे बाबत.**

कामाची मुदत :- **५** दिवस

**नाशिक महानगरपालिके निवडणूक विभागासाठी लागणारे जनजागृत्ती स्टिकर्स छपाई करून पुरविणे कामी अनुभवी पुरवठादारांकडुन विहीत नमुन्यात दरपत्रके मागविणेत येत आहे.**

**कामाचा तपशिल**

| अ.क्र. | विभाग | तपशिल | फॉर्मचे नाव | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | निवडणूक विभाग | स्टिकर साईज A४ एक बाजुस, चार रंगात ऑफसेट छपाई स्टिकर पेपर, लॅमिनेशन व हाफ कटिंग | मतदार जागृती अभियान स्टिकर्स | १००० नग |
| | | | | |

## ❋ अटीशर्ती ❋

१. वरील कामाचे कोरे कोटेशन पत्रक (अटी शर्तीसह) www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दि. ०१/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.

२. सदरचे कोटेशन पाकिट दि. ०१/११/२०२१ रोजी दु. ४.०० वा. पर्यंत छपाई व वितरण, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे सादर करावे. विहीत मुदती नंतर आलेली कोटेशन पाकिटे स्विकारली जाणार नाही.

३. पुरवठा ऑर्डर मिळलेपासुन ५ दिवसांचे आत किंवा तत्पुर्वी संपुर्ण मालाचा पुरवठा करावा लागेल.

४. कोटेशनमध्ये प्रती नगाचा दर नमुद करावा. तथापी सदर कामाचा न्युनत्तम दर ठरविणेसाठी एकुण एंकदर खर्च विचारात घेतला जाईल. कोटेशनमधील दर खर्चासह व सर्व करांसह दर (GST सह) नमुद करावे. कोणत्याही खर्चाची व कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

५. सदर कोटेशन नोटीसमध्ये नमुद कोटेशन सोबत कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य केली जाणार नाही. अटी- शर्ती नमुद केलेले कोटेशन विचारात घेतले जाणार नाही. कोटेशन सोबत शॉपक्ट नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुट असलेबाबत पुरावा, पॅनकार्ड, GST नोंदणी प्रमापत्र तसेच छपाई कामाचा अनुभव असलेबाबत पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

६. मालाची पोहोच छपाई व वितरण विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे अथवा कार्यादेशात नमुद ठिकाणी द्यावी लागेल. त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

७. यशस्वी कोटेशन धारकास सदरचे कोटेशनमधील दर व काम मान्य असले बाबतचा रक्कम रुपये ५२०/- चे जनरल स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

८. सदर कामाचे कोणतेही कोटेशन अथवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.

९. मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रक्कमेच्या ५% या प्रती सप्ताह किंवा त्याच्या भागाला याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

Sd/-
(मनोज घोडेपाटील)
उपआयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

ठिकाण :- नाशिक
दिनांक :- २५/१०/२०२१

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## छपाई व वितरण विभाग
## -: कोटेशन फॉर्म :-

संदर्भ :- जा.क्र. छपाई/वशि/१०५/२०२१, दि. २५/१०/२०२१ ची मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली कोटेशन नोटीस

कामाचे नाव :- कालावधीत जनजागृत्ती स्टिकर्स छपाई करणे बाबत.

कामाची मुदत :- कार्यादेश मिळालेपासुन ५ दिवस किंवा तत्पुर्वी

कोटेशन फॉर्म मिळण्याची अंतिम तारीख व वेळ :- दि. ०१/११/२०२१ रोजी दु. ३.०० वाजेपावेतो.

कोटेशन जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ :- दि. ०१/११/२०२१ रोजी दु. ४.०० वा.पर्यंत

कोटेशन जमा करण्याचे ठिकाण :- छपाई व वितरण विभाग, राजीव गांधीभवन, शरणपुर रोड, मनपा, नाशिक

कामाचा तपशिल

| अ.क्र. | विभाग | तपशिल | फॉर्मचे नाव | संख्या | दर (प्रती हजारी) | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निवडणूक विभाग | स्टिकर साईज A४ एक बाजुस, चार रंगात ऑफसेट छपाई स्टिकर पेपर, लॅमिनेशन व हाफ कटिंग | मतदार जागृती अभियान स्टिकर्स | १००० नग | | |
| | | | | | | |

आम्ही उपरोक्त कामासाठी सर्व करांसह व खर्चासह वरीलप्रमाणे दर सादर करीत आहोत. आम्ही कोटेशन नोटीस मधील अटी - शर्ती वाचल्या असुन त्या आम्हास मान्य व कबुल आहेत. सदरच्या अटी शर्थीस अधिन राहुन उक्त दराने काम करण्यास तयार आहोत. तरी आम्हाला कामाचा आदेश मिळावा ही नम्र विनंती.

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

संपर्क क्र. :-

ठिकाण :-

दिनांक :-

कोटेशन देणा-याची सही व शिक्का

---

(कार्यालयीन उपयोगाकरीता)

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## छपाई व वितरण विभाग

## सर्व साधारण अटी शर्ती (कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) कोटेशन नोटीस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३) कार्यादेशात नमुद मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत सक्षम प्राधिका-याचा निर्णय अंतिम राहील.

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात रक्कम रुपये ५२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) GST करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रक्कमेच्या ५% या प्रती सप्ताह किंवा त्याच्या भागाला याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

९) मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफिकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल / अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

१०) कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशन धारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

११) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.

१३) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) मा.शासनाचे गव्हमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवते बाबत साम्य असलेस अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल. पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने खरेदी करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

Sd/-
उपआयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. तसेच आम्हास/ आमचे फर्मला कोणत्याही शासकिय / निमशाकिय प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नाही हे प्रतिज्ञेवर जाहिर करीत आहोत.

कोटेशनधारकाची सही व शिक्का